दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र ● रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## सुरेश धस यांनी बीडच्या जनतेचा विश्वास गमावला

**बीड–**भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यात भेट झाली. या भेटीवरून राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील आमच्या तिघांमध्ये साडे चार तास भेट झाल्याचे सांगितले आहे. यावरून आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सुरेश धस यांच्यावर टीका केली आहे. सुरेश धस असे करूच कसे शकतात? असा सवालच सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या, सुरेश धस बीडच्या जनतेचा विश्वास गमावत आहेत. मला संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे वाईट वाटते ज्यांनी सुरेश धस यांच्यावर एवढा विश्वास टाकला. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन बीडच्या जनतेचा विश्वास गमावला. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणामध्ये कधी ते पोलिसांना माफ करा म्हणतात, कधी ते धनंजय मुंडेंच्या घरी जाऊन भेटतात. ही संभ्रमावस्था ते का निर्माण करतात? ते फक्त स्वतःचा विश्वास गमवत नाहीत तर ते देवेंद्र फडणवीस यांची विश्वासार्हता सुद्धा गमवत आहेत.

# गतिमान आणि प्रगतीशील कायदा–सुव्यवस्था उभी करणार

## अमित शहा यांच्यासोबत देवेंद्र फडणवीस यांची बैठक

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवीन फौजदारी कायद्यासंदर्भातील महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा आढावा घेतला. या तीन कायद्याच्या अंमलबजावणीतून राज्यात गतिमान आणि प्रगतीशील कायदा–सुव्यवस्था उभी करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे तीन नवीन कायद्यांच्या संदर्भात आढावा बैठक घेतली. या कायद्यांची राज्यात अंमलबजावणी कशा पद्धतीने होते आहे, त्यासाठी निर्माण करावयाच्या संस्थात्मक आणि पायाभूत सुविधांची स्थिती काय आणि किती प्रकरणे दाखल झाली याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. भारतीय न्यायसंहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य संहिता असे हे तीन कायदे आहेत. अलिकडेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, उत्तराखंड आणि हरयाणा या राज्यांकडून आढावा घेतला होता.




आज महाराष्ट्राचा आढावा घेण्यात आला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु आहे. २७ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन रुजू झाल्या असून, पुढच्या ६ महिन्यात संपूर्ण नेटवर्क तयार होईल. ज्या गुन्ह्यात ७ वर्षापेक्षा जास्त शिक्षा आहे, अशा प्रकरणात आता मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनच्या माध्यमातून घटनास्थळीच न्यायवैद्यकीय परीक्षण केले जाणार आहे. यातून गुणवत्तापूर्ण पुरावे उपलब्ध होणार आहेत. राज्य पोलिस दलाच्या २ लाखांच्या फोर्सपैकी ९० टक्के लोकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, उर्वरित १० टक्के प्रशिक्षण सुद्धा ३१ मार्चपूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.आरोपींना वारंवार कोर्टात फोर्स घेऊन जावे लागू नये, यासाठी नवीन कायद्यान्वये कारागृहात साक्षीसाठी क्युबिकल्स उभे करुन ते न्यायालयाशी ऑनलाईन जोडून देण्यात येणार आहेत. प्रत्येक कोर्टाचे विशिष्ट क्युबिकल असणार आहेत. ६ ते ८ महिन्यात हेही काम आम्ही पूर्ण करणार आहोत. पोलिस वाहन, सुरक्षेवरील ताण आणि न्यायालयातील गर्दी यामुळे कमी होणार आहे. नवीन कायद्यानुसार, वारंवार न्यायालयात तारखा मागता येणार नाही, याची तरतूद असल्याने सरकारी वकिलांना त्याचे प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. अतिशय चांगले मार्गदर्शन आजच्या बैठकीत मिळाले आहे. हे तिन्ही कायदे लागू करण्यासंदर्भात अधिक वेगाने आम्ही काम करु, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.२६/११ चा अपराधी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणासाठी अमेरिकेने होकार दिला, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मी अतिशय आभारी आहे. आम्ही गेल्यावेळी तहव्वूर राणाची ऑनलाईन साक्ष घेतल्यानेच या प्रकरणात पाकिस्तानचा सहभाग सिद्ध झाला. मुंबईवरील हल्ल्याच्या घटनेत अंतिम न्यायाची वेळ आता आली आहे. हा खटला मुंबईत चालणार असल्याने त्याला मुंबईतच आणले जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राणाला मुंबईतील कारागृहात ठेवण्यासाठी सुरक्षा व्यवस्था आहे का, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता मुख्यमंत्री म्हणाले, कसाबला आम्ही मुंबईतील जेलमध्ये ठेऊ शकतो, तर तहव्वूर राणा आहे कोण?.

## उन्हाळ्याची चाहूल, गरिबांचा फ्रीज बाजारात

### माठाच्या किमतीत भरमसाठ बाट

**अंबाजोगाई | परवेज पटेल**

अंबाजोगाई यंदा जानेवारीच्या शेवटच्या आटवड्यापासून रात्री थंडी तर दिवसभर कडक उन्ह पडत होते. फेब्रुवारी सुरू होताच उन्हाची तीव्रता वाढली आहे. मार्च, एप्रिल, मे महिण्याचा विचार नं केलेला बरा, अशी स्थिती आत्ताच पाहिला मिळत आहे. फेब्रुवारी दुसऱ्या आठवड्या उन्हाची धग सुरू झाली आहे. थंड पाण्यासाठी मात्र गरिबांचे फ्रीज म्हणून संबोधले जाणाऱ्या मातीच्या माठाला सर्वाधिक मागणी असल्याने शहरात ठिकठिकाणी माठ नव्या आकारात विविध रंगाढंगात बाजारात उपलब्ध झाले आहेत.अंबाजोगाई तालुक्यात गेल्या आठ दिवसापासुन कडक उन्हाळा सुरु झाला आहे

उकाडा वाढताच प्रत्येकाला उकाड्यापासून



सुटका पाहिजे असते. शितपेयाबरोबरच थंड पाण्याची गरज आसते. उन्हाळ्यात तहाण भागवण्यासाठी शहरातील कांही कुटूंब फ्रीज जारच्या पाण्याचा वापर करतात. तर शहरातील गोरगरीब व ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंब, सर्वसामान्य नागरिकांचा कल हा माठाच्या पाण्याकडे असतो. शहरातील विविध भागात आकर्षक असे मातीचे माठ विविध रंगात विक्रीस दाखल झाले आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी उन्हाळ्याच्या दिवसात घरी, शेतात थंड पाण्याचा आनंद घेण्यासाठी बहुतेक शेतकरी, मजुर हे मातीच्या माठाचा वापर आज ही करताना दिसत आहेत. कुंभार बांधव हे मातीपासून बनवलेले छोटे- मोठे माठ हे शंभर रुपयांच्या आसपास विक्री करत असायच्या पण कालांतराने यात अमुलाग्र बदल होउन तुट्टी असलेल्या माठाची मागणी वाढली. उन्हाळा सुरू होत कुंभार बांधव हे मातीपासून बनवलेले छोटे- मोठे माठ हे शंभर रुपयांच्या आसपास विक्री करत असायच्या पण कालांतराने यात अमुलाग्र बदल होउन तुट्टी असलेल्या माठाची मागणी वाढली. उन्हाळा सुरू होत असल्याने स्थानिक व परराज्यातील व्यावसायिकांनी शहरातील विविध ठिकाणी आकर्षक असलेल्या माठांचे स्टॉल बाजारात लागले आहेत

## श्री संत सेवालाल महाराजांची शिकवण युवकांनी आत्मसात करावी–बदामराव पंडित



**गेवराई | प्रतिनिधी**

श्री संत सेवालाल महाराज यांनी माणसांसह प्राण्यावर प्रेम करा आणि जंगल नष्ट न करता ते सांभाळा असा संदेश दिला. लढवय्ये असलेल्या श्री संत सेवालाल महाराज यांनी सर्व जाती धर्माला एकत्र मिळून प्रेमाने राहावे असाही संदेश दिलेला आहे. त्यांनी दिलेली शिकवण आजच्या युवा पिढीने आत्मसात करावी आणि त्यांनी दाखवलेला मार्ग समजून घ्यावा असे प्रतिपादन शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे. श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी शिवसैनिकांसह बदामराव पंडित यांनी श्री संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य शामराव गुरुजी राठोड, कैलास राठोड, माजी पं स सदस्य भास्करराव कचरे, माजी पं स सदस्य महादेव औटी, सरपंच मुकुंद बाबर, सरपंच फत्तेमामू, माजी सरपंच महादेव खेत्रे, युवानेते गणेश चव्हाण, संतराम महाराज, गोरख राठोड़, गोविंद काळे, पंडीत पवार, बाबासाहेब राठोड़, जाधव मामा, पींटु राठोड़, काशिनाथ अडागळे, सुलेमान भाई, दत्ता राठोड़, विजय राठोड़, मानसिंग आडे, हरीभाऊ गलधर, पंकज राका, कैलास तौर, मिलिंद वाघमारे, सुनिल कांडेकर यांच्यासह महिला व समाज बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

## प्रेयसीचा खून करून घरात पुरला मृतदेह

### व्हॅलेंटाईन डेच्या दिवशीच खळबळजनक घटना उघड जालन्याच्या नर्सचा लासूर स्टेशन येथे दाबला गळा

### नराधम प्रियकराला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**छ.संभाजीनगर | प्रा संजय तुपे**

जालना / लासूर स्टेशन प्रेयसीला खून करून तिचा प्रेत शेतातील घरात पुरल्याचा अत्यंत खळबळजनक प्रकार 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी शुक्रवारी (दि.१४) उघडकीस आला. या प्रकरणातील पोलिसांनी संशयित प्रियकारास बेड्या ठोकल्या आहेत. मोनिका सुमित निर्मळ (३०, रा. जमुनानगर, जालना) असे मृत तरुणीचे तर शेख इरफान शेख पाशा (३५, रा. लासूर स्टेशन) असे आरोपीचे नाव आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी विचारणा करताच मोनिकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा दावा आरोपी इरफान शेख याने केला. पण तपासात त्यानेच गळा आवळून तिचा खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पुरल्याचा अंदाज आहे. तर आपल्या मुलीचा तिच्या सासरच्यांनी सुपारी देऊन इरफानच्या हस्ते काटा काढल्याचा संशय तिच्या आईने व्यक्त केला. त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे.

जालना शहरातील जमुनानगरातील तरुणी मोनिका सुमित निर्मळ ही छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या आयुष्मान रुग्णालयात आरोग्यसेविका म्हणून कार्यरत होती. ती पतीपासून विभक्त होती. माहेरी आईसोबत राहून ती रेल्वेने जालना येथून अपडाऊन करीत होती. ६ फेब्रुवारी रोजी ड्यूटीवर आल्यानंतर मोनिका घरी परत गेलीच. तिचा मोबाइलही लागत नव्हता, त्यामुळे.

लासूर स्टेशन परिसरातील शेतात याच पडक्या घरात मोनिकाचा मृतदेह पुरण्यात आला होता.

**मोनिकाच्या मोबाइलवरून नातेवाईकांना मॅसेज**

दोन दिवसांनी मोनिकाच्या मोबाइलवरून तिच्या नातवाईकांना मी सुखरूप असून, मी लग्न केले आहे. आता मी तुम्हाला वर्षांनीच भेटायला येईल, अशा आशयाचा मेसेज आला. त्या मोबाइलवर कॉलबॅक केला असता फोन लागलाच नाही.



त्यामुळे शंका आल्याने नातेवाईकांनी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना भेटून तात्काळ तपासाची मागणी केली होती.

**सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल्स ठरला महत्त्वाचा पुरावा**

जालना पोलिसांनी मोनिकाचा प्रियकर शेख इरफान शेख पाशा (रा. लासूर स्टेशन) यास ताब्यात घेऊन चार दिवसांपूर्वी चौकशी केली होती. मात्र, त्याने आपल्याला काहीच माहिती नसल्याचे सांगितल्याने त्याला सोडून दिले होते. तथापि त्याच्या संशयास्पद हालचालींवर पोलिसांचे बारकाईने लक्ष होते. पोलिसांनी इरफानच्या मोबाइलच्या कॉल डिटेल्ससोबतच लासूर स्टेशन येथील काही सीसीटीव्ही फुटेज तपासले. मोनिकासोबतचे तासनतास केलेले मोबाइल संभाषण आणि ६ फेब्रुवारीला लासूर स्टेशन येथे फुटेजमध्ये मोनिका व इरफान दिसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी त्यास गुरुवारी (दि.१३) पुन्हा ताब्यात घेतले. त्याला पोलिसी खाक्या दाखवताच, त्याने अखेर तोंड उघडले.

**दररोजच्या भेटीने जुळले प्रेमसंबंध**

छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानकापासून रुग्णालयात येण्या–जाण्यासाठी तिच्याकडे असलेली दुचाकी ती रेल्वे स्थानकावरील वाहनतळावर उभी करीत असे. दररोजच्या भेटीमुळे मोनिका आणि वाहनतळावर काम करणाऱ्या शेख इरफान (३५) हे चांगलेच परिचित होते. त्यातून ते एकमेकांशी बोलायचे. दररोजच्या भेटीमुळे या दोघांचे प्रेमसंबंध जुळल्याचा अंदाज आहे.

## रांजणी ग्रामपंचायत कार्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी



**जालना | असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी ग्रामपंचायत कार्यालयात शनिवारी संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांचे अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच अमोलभाऊ देशमुख, उपसरपंच शेख रहिम, माजी सरपंच राधाकिसन जाधव, ग्रामपंचायत सदस्य भगवानसिंह जनकवार, कैलास वरखडे, दगडू भालेकर, शिवाजी पाटोळे, बालचंद चव्हाण, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार खुळे, शाम चव्हाण, लक्ष्मण पाटोळे, विकास पवार, गोविंद राठोड, कैलास जाधव, सचिन पाटोळे लालचंद चव्हाण, रणजित राठोड, गणेश चव्हाण, विलास चव्हाण यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाशिकचे पालकमंत्री भुसेच एकनाथ शिंदे यांचे संकेत

### नाशिकमध्ये आढावा बैठकीमध्ये साधला संवाद

**नाशिक (वृत्तसंस्था)**

नाशिकच्या पालकमंत्री पदी दादा भुसे होतेच. आताही ते बैठकीला उपस्थित होते. गिरीश महाजनही कुंभमेळा मंत्री म्हणून काम पाहत आहेत. असे बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अप्रत्यक्षपणे नाशिकचे पालकमंत्री दादा भुसेच असतील असे संकेतच दिले. विधानसभा निवडणुकीत शिवसेना महायुतीला दिलेल्या भरघोस यशानंतर आभार दौऱ्याच्या निमित्ताने शुक्रवारी (दि.१४) शिंदे नाशिकला आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात सिंहस्थ तयारीचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. एकीकडे सिंहस्थाच्या तयारील गती दिली जात आहे. पण नाशिकचा पालकमंत्री मात्र निश्चित होत नाही, असा सवाल शिंदे यांना करण्यात आला. याबाबत ते म्हणाले, 'पालकमंत्री पदाचा तिढा लवकरच सुटेल.

## संपादकीय..

# झटपट श्रीमंत नाद; लाखो गुंतवणूकदारांना गंडा




दादर येथील शिवाजी मंदिर परिसरात टोरेस कंपनीच्या नावाखाली उघड झालेल्या आर्थिक घोटाळ्याने सर्वसामान्य, मध्यमवर्गीय नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. दर आठवड्याला ११ टक्के व्याजदर परतावा देण्याचे आमिष दाखवून 'टोरेस' नावाच्या कंपनीने ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून घेतली. आधी सोने, हिऱ्याचे दागिने विकण्यापासून सुरुवात केलेल्या या कंपनीने गुंतवणुकीच्या माध्यमातून बक्कळ पैसा उभा केला. सुरुवातीच्या काळात सांगितल्याप्रमाणे आठवड्याला व्याजदर परतावा दिला गेला. त्यातून हजारो गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. पण मागील आठवड्यात अचानक या कंपनीच्या सर्व शाखांना टाळे लागल्याचे बघून गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले. या शाखांच्या बाहेर हवालदिल ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. 'टोरेस'च्या नावाखाली मुंबई, ठाणे व आसपासच्या भागात ज्या शाखा सुरू करण्यात आल्या होत्या, त्यातील जवळपास सव्वालाख ग्राहकांची फसवणूक झाल्याची बाब पोलीस तपासातून पुढे येत आहे. टोरेस कंपनीच्या नावावर ग्राहकांची फसवणूक करणारा फंडा हा काही नवा प्रकार नाही. मुंबईत दोन महिन्यांत पैसे दुप्पट करून देतो, असे सांगणाऱ्या शेरेकर सारख्या अनेक खासगी कंपनीचा वन टू फॉरचा प्रकार गेल्या १५ ते २० वर्षांत मुंबईकरांनी अनुभवला आहे. पण त्यातून काही शहाणपण घेताना कोणी दिसत नाही. म्हणूनच असे प्रकार घडत असावेत.

टोरेस कंपनीने कसे गंडवले ते एकदा पाहू. २०२३ मध्ये 'प्लॅटिनम हरेन प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने 'टोरेस' ब्रँड अंतर्गत सुरुवात केली. दादरमध्ये ३० हजार चौरस फुटांचा भव्य आउटलेट सुरू केला आणि मुंबईत दादरसह ग्रँट रोड, नवी मुंबई, कल्याण आणि मीरा रोड या भागात शोरूम सुरू करण्यात आले. कंपनीने ग्राहकांना भुरळ घालण्यासाठी सेमिनार्स घेतले. त्यात सोने, चांदी आणि हिरे स्टोनवर गुंतवणूक केल्यास तुम्हाला दुप्पट रिटर्न मिळेल. एवढंच नाही, तर एका आठवड्याला पैसे मिळण्याचे वचनही देण्यात आले. गेल्या वर्षभरापासून मुंबईतील अनेक भागांत याच योजनेच्या माध्यमातून डिसेंबरपर्यंत कंपनीने नियमित पैसे ग्राहकांना परत दिले होते.

टोरेस कंपनीत गुंतवणूक करणाऱ्यांना अवघ्या ४ हजार रुपयांपासून गुंतवणूक करता येत होती. ही कंपनी रविवारी पैसे गुंतवल्यास सोमवार ते शुक्रवारदरम्यान त्याचा परतावा देत असे. सहा लाखांपर्यंतच्या गुंतवणुकीवर कंपनीकडून ६ टक्के व्याज देत होती. तर सहा लाखांपेक्षा जास्त गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदारांना ११ टक्के व्याज मिळत होते. सुरुवातीच्या काळात टोरेस कंपनीने उच्चभ्रू इमारतीत घरे, गाड्या आणि दागिने असा आकर्षक परतावा काही ग्राहकांना दिला. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास बसला. मुंबईत गुंतवणुकीवर घसघशीत रिटर्न्स देणाऱ्या टोरेस कंपनीच्या बिझनेस मॉडेलची सातत्याने चर्चा होत होती. यानंतर अनेकांनी डोळे झाकून लाखो रुपये टोरेस कंपनीत गुंतवले. मात्र टोरेस कंपनीने आपला गाशा आता गुंडाळला आहे.

एकट्या दादर शाखेतील गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यात सुमारे १३ कोटी ४८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. एकूण सगळ्या बंद शाखेतील ग्राहकांनी पोलीस ठाण्यात तक्रारी करण्यास सुरू केली आहे. 'टोरेस ज्वेलरी' या नावाखाली आतापर्यंत तब्बल सव्वालाख लोकांची एक हजार कोटींची फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकारात कंपनीच्या तीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना अटक केली असली, तरी कंपनीच्या दोन संस्थापकांनी विदेशात पलायन केले. ते दोघे युक्रेनचे नागरिक आहेत. पैसे मिळणे सोडाच; परंतु आकर्षक व्याजाच्या आमिषापायी अनेक कुटुंबावर मोठं आर्थिक संकट उभे राहिले आहे. कंपनीवर विश्वास ठेवून दुप्पट रिटर्नच्या अपेक्षेने कुटुंबाचे दागिने गहाण ठेवून गुंतवणूक केली. पण आता दागिने गायब झाले, अशी एका गुंतवणूकदाराची प्रतिक्रिया आहे. तर दादर येथील भाजी विक्रेते प्रदीपकुमार वैश्य यांनी साडेचार कोटी रुपयांची गुंतवणूक या कंपनीत केली होती. भाजीच्या दुकानासमोरच टोरेसचे आलिशान कार्यालय होते. सुरुवातीला एक लाख रुपयाच्या गुंतवणुकीवर आठवड्यात व्याज मिळाल्यानंतर त्याने कुटुंबीयांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. अवघ्या सात महिन्यांत वैश्य यांनी सर्वाधिक साडेचार कोटी गुंतवले. त्यांच्या तक्रारीवरून शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. भविष्यात पोलीस आरोपींना पकडतील.


काही महिन्यानंतर प्रकरण शांत झाल्यावर आरोपींना जामीन मिळेल. मात्र गुंतवणूकदारांना स्वत:च्या घामाची मूळ रक्कम पुन्हा मिळविण्यासाठी कोर्टाच्या आदेशाची प्रतीक्षा करावी लागणार आहे; परंतु अशा आर्थिक घोटाळ्याला जसे लोभी गुंतवणूकदार जबाबदार आहेत, हे आपण मान्य करायला हरकत नाही; परंतु असे घोटाळे रोखण्यासाठी पोलीस प्रशासनापासून शासकीय यंत्रणा सुस्त आहेत, असे नाही का वाटत? बँकांनीही किती व्याजदर द्यावे, याचे निकष रिझर्व्ह बँक ठरवते. त्यामुळे आठवड्याला, महिन्याला व्याजदर देणारी कंपनी आपल्या परिसरात कार्यरत असेल तर स्थानिक पोलिसांनी त्याकडे लक्ष द्यायला नको का? तरुणांनी एकत्र येऊन नवा व्यवसाय सुरू करायचा म्हटला तर, त्यासाठी लागणाऱ्या परवानगीसाठी अनेक कष्ट सहन करावे लागतात. तर मग, असे गैरप्रकार घडत असतील तर रोखण्यासाठी सरकारी बाबूंनी स्वतंत्र यंत्रणा उभारायला नको का? टोरेस कंपनीच्या गुंतवणूकदारांवर पश्चात्तापाची वेळ आली आहे. आम्हाला व्याज नको. पण आम्ही गुंतवलेले पैसे तेवढे परत करा, या मागणीसाठी त्यांचा आता संघर्ष सुरू झाला आहे.

# नव वर्ष अन् आपल्या जबाबदाऱ्या!




नव वर्ष, नवा आरंभ नमस्कार! २०२५ हे वर्ष संयुक्तराष्ट्र महासभेने क्वॉटम (ींींरा) विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष म्हणून घोषित केले आहे. या सहकारिता वर्षात परस्परांना सहकार्य आणि प्रोत्साहन देत नव्या वर्षाचे स्वागत करू या. क्वॉटम विज्ञान ही भौतिक शास्त्राची एक महत्त्वाची शाखा असून तेथे अतिसूक्ष्म कणांच्या वर्तणुकीचा अभ्यास केला जातो. नव वर्ष : नवा संकल्प : स्वतःचे स्वप्न साकार करण्यासाठी केलेला संकल्प जीवनात बदल घडवून आणतो. वैयक्तिक संकल्पापेक्षा देशातील किंवा समाजातील प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने हे नव वर्ष एक चांगली संधी आहे. कारण नव वर्ष आनंदाबरोबर नव्या अपेक्षा आणते. आपण सर्वांनी देशाच्या प्रश्नासाठी संकल्प करून आपली जबाबदारी उचलू या. जागतिक हवामान परिषदेत प्रत्येक राष्ट्रांनी आपापल्या कार्बन उत्सर्जनात कपात करावी असा करार मंजूर झाला. जीवसृष्टी नष्ट होत असताना जगातून २०५० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जन हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कोळशाचा इंधनाचा कमीत कमी वापर करून इतर नूतनीकरण ऊर्जेकडे किंवा अक्षय ऊर्जेकडे (सौर, पवन) वळणे जरुरी आहे. हवामान बदल ही जागतिक समस्या धर्म, जात, पंथ, वर्ग, वर्ण असा भेद न करता समस्त लोकांचे हाल वाढवीत आहे. जगापुढील पर्यायाने भारतापुढेही हा ज्वलंत प्रश्न आहे. आपल्यापुढील पहिले आव्हान हवामान बदलाचे परिणाम आपण पाहत आहोत. नवी दिल्लीत हवेचा दर्जा अत्यंत खाली घसरला आहे. मुंबईतील हवा धुरकट. जनता सातत्याने आजारी. यावर्षी दिवाळीपर्यंत पडणाऱ्या पावसाने शेतीचे झालेले नुकसान, या साऱ्याला आपणच जबादार आहोत. कारखान्यांमधून बाहेर पडणारे पाणी, हवा त्याहीपेक्षा किंवा त्याचबरोबरीने आपल्या घराघरांत अन्न, पाणी, विजेची होत असलेली नासाडी, कचरा बाहेर टाकणे, थुंकणे, रोजच्या रोज दूध-भाजीसाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर, मोसमाच्या आधी फळे पिकविणे या सर्वसामान्यांच्या कृतीच हवामान बदलला कारणीभूत आहेत हे सिद्ध झालंय.दुसरे आव्हान सलोखा बहुभाषिक, बहुप्रांतीय भारतात समस्यांना चौकट घालताच येणार नाही. समस्या असूनही प्रत्येकाच्या रोजच्या मैत्रीमध्ये विभिन्न भाषिक, प्रांतीय, धर्मीय सण उत्सवात एकोपा/देवघेव खूप चांगली आहे; परंतु त्या जवळच्या व्यक्तींच्या व्यतिरिक्त जो तो आपल्यामध्येच. ओळखत असूनही ओळखच नाही असे वागणे असते. काही अपवाद वगळता माणसामाणसांत, नात्यांत इतका तुटकपणा, अलिप्तपणा वाढलाय. कुणालाही एकमेकांशी बोलायला, बघायला किंवा मदतीसाठी स्वतःचा वेळ द्यायलाही तयार नाहीत. शेजारचे १० दिवस नव्हते तरी आम्हाला समजले नाही. माणूस माणसापासून दुरावत चाललाय. तेव्हा स्वतःहून हात पुढे करा. तिसरा प्रश्न : मोबाईल; मास मीडियामुळे जग जवळ आले. मोजके अपवाद वगळता त्याचा उपयोग स्वतःचा आवाका वाढविण्यासाठी, स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी न होता सेल्फी,चॅटिंगमध्ये वेळ जातोय. रिमोट जरी आपल्या हातात असला तरी स्वतःवर ताबा नसतो. चौथा प्रश्न घरचे खाणे, भविष्याकडे पाहता आजची गरज हा उद्याचा यक्षप्रश्न ठरतो. आरोग्यासाठी नितांत गरज असलेल्या घरच्या खाण्यासाठी स्वयंपाकात प्रत्येकाचा सहभाग असावा. माहीत असलेल्याच प्रश्नाकडे नवी आव्हाने म्हणून नव्याने मूल्यमापनाची गरज आहे. म्हणून नव वर्ष : आपल्या जबाबदाऱ्या हे शीर्षक लिहिले.मला समाजासाठी काहीतरी करायचे, मला असा बदल घडवून आणायचा आहे जो इतिहासाच्या पानावर लिहिला जाईल. कॉलेज युवती प्राची शेवगांवकर. तिने स्वतःचे, त्याशिवाय ११० देशांतील लोकांच्या मदतीने २५ लाख कार्बन उत्सर्जन कमी केले. विचार करा, आपण येथे काय करू शकतो. १. आज प्रत्येकाची गाडी, उबेर, रिक्षामधून होणारा स्वतंत्र प्रवास, प्रत्येक टप्प्यावर कार्बन फूट प्रिंट वाढवतो. २. लिफ्टमुळे एक-दोन जिनेही चढण्याचा आज तरुण कंटाळा करतात. ३. आपण वीज गेल्यावर काहीकाळ राहतो; परंतु वीज असताना दहा मिनिटेही वीज बंद ठेवत नाही. ४. टप्प्याप्प्याने प्लास्टिकचा वाढणारा वापर आपण कमी करू शकत नाही. आपल्यासमोरील विक्रेत्याला, ग्राहकाला सांगूनही उपयोग होत नाही. हे जमिनीवर पडलेले प्लास्टिक, त्या प्लास्टिकमुळे होणारे समुद्राचे प्रदूषण, त्यातून धोक्यात आलेली सागरी परिसंस्था वाचविण्यासाठी नेदरलँडच्या १३ वर्षांच्या शाळकरी मुलीने लीली प्लॅट हिने प्लास्टिक मुक्तीसाठी प्लास्टिक सूप ही मोहीम जगभर सुरू केली. युनायटेड नेशनने ती मोहीम उचलून धरली. ५. वापरा आणि फेका ऐवजी बऱ्याच वस्तूचा आपण पुनर्वापर करू शकतो. पुनर्वापर करणे ही कंजूसी नव्हे. ६. प्रत्येक वॉर्डमध्ये विशिष्ट जागी हरित पट्याची बांधणी हवी. ७. आपल्या पंतप्रधानांचा मंत्र आईच्या नावाने कमीतकमी एक झाड लावा नि जोपासा. मुंबईत राणीच्या बागेत गेट नंबर ४ येथे अगदी कमी पैशात मोठी वाढणारी झाडे दिली जातात. ८. सार्वजनिक वाहनांचा उपयोग करणे आता गरजेचे आहे.सुमेधा चिथडे ह्यांनी लोकांच्या मदतीने सियाचीन येथे प्रथम, नंतर जम्मू-काश्मीर मधल्या कुपवाडा येथे सैनिकांसाठी पहिला ऑक्सिजन प्लांट व रिफिलिंग सेंटर उभे केले आहे. देश आणि समाजातील प्रश्नांवर अनेक व्यक्ती, संस्था कार्यरत आहेत. त्यांना हातभार लावू शकतो, सहभागीही होऊ शकतो. मी भारतीय आहे. आपली जबाबदारी ओळखा. हे नवीन वर्ष तुमच्या आयुष्यात एक नवी दिशा ठरावी यासाठी माझ्या शुभेच्छा!

# योग्य वेळेत परीक्षेचा पेपर कसा सोडवाल?



नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत असताना जानेवारी महिन्याचे दोन आठवडे कधी गेले हे समजले सुद्धा नाही आणि दोन आठवड्याने फेब्रुवारी महिना सुरू होईल, तेव्हा फेब्रुवारी महिन्यापासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षा सुरू होतील. म्हणजे महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या १०वी आणि १२वीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार असून दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत घेतली जाणार आहे. तेव्हा बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्नपत्रिका सोडविल्या असतील. मात्र अंतिम परीक्षेचा पेपर सोडविताना विद्यार्थ्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. कारण त्यांची ओळख या परीक्षेच्या गुणांमुळे होत असते. तेव्हा कोणत्याही प्रकारे विद्यार्थ्यांनी पेपर सोडवताना घाई न करता दिलेली वेळ व विचारलेले प्रश्न यांची सांगड घालून त्यांची उत्तरे बिनचूक लिहिणे आवश्यक आहे. यासाठी आपण वर्षभर अभ्यास करत असतो. तेव्हा आता अंतिम परीक्षेत किरकोळ चुका करून चालणार नाही.

विद्यालयामध्ये प्रत्येक विषयाचे अध्यापक प्रश्नपत्रिका कशी सोडवावी या विषयी मार्गदर्शन करीत असले तरी काही विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेविषयी चिंता वाटत असते. जर संबंधित विषयाचा अभ्यास झाला असेल तर विद्यार्थ्यांना चिंतेचे मुळीच कारण नाही. जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे दडपण वाढते याची सुद्धा कल्पना सर्वांना असते. मात्र मनावर दडपण न घेता बिनधास्तपणे परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचा विचार करता विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असतात. तेव्हा पेपर सोडवताना विद्यार्थ्यांनी काळजी घेतली पाहिजे.

या दोन परीक्षांवर विद्यार्थ्यांची पुढील दिशा ठरत असते. ज्या दिवशी पेपर असेल त्या वेळच्या नियोजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल. पेपरची वेळ असेल त्या अगोदर किमान अर्धा तास परीक्षा केंद्रावर गेले पाहिजे. आपली आसन व्यवस्था पाहावी तसेच काही सूचना दिल्या असतील तर त्या वाचाव्यात. जर परीक्षा केंद्रावर उशिरा गेलात तर विद्यार्थी चलबिचल होतो. त्याला आयत्या वेळी काहीच सुचत नाही. त्यामुळे तो टेन्शनमध्ये येऊ शकतो. हे टाळण्यासाठी परीक्षेच्या वेळेच्या अगोदर परीक्षा केंद्रावर यावे. अंतिम परीक्षेची प्रत्येकाला चिंता वाटत असली तरी या कालावधीत आपला विश्वास स्वत:च वाढवला पाहिजे. बऱ्याचवेळा आपला अभ्यास झालेला असून सुद्धा प्रश्न कसे विचारले जातील? मला उत्तर लिहिता येईल का? असे अनेक प्रश्न मनात निर्माण होऊ शकतात. तेव्हा असे प्रश्न निर्माण न करता आपलं डोकं शांत ठेवून मनमोकळेपणानं राहावं. परीक्षा केंद्रावरील ज्या रूममध्ये बैठक व्यवस्था केलेली असेल त्याठिकाणी शांत जाऊन बसणे. वेळेनुसार उत्तर पत्रिका पर्यवेक्षकांनी आपल्या हातात दिल्यावर आवश्यक माहिती खाडाखोड न करता अचूक भरावी. महत्त्वाची बाब म्हणजे परीक्षा क्रमांक अचूक लिहावा. तसेच पेन्सिलने प्रत्येक पानावर समास आखून घ्यावा. यामुळे उत्तरपत्रिका आकर्षित दिसते.

प्रश्नपत्रिका आपल्या हातात आल्यावर आपली वेळ सुरू होते. काही विद्यार्थी प्रश्नपत्रिका वाचनात वेळ घालवितात. नंतर वेळ अपुरी पडली अशी बोंबाबोंब करतात. त्यामुळे प्रथम पूर्ण प्रश्नपत्रिकेवर नजर फिरवावी. नंतर जे प्रश्न आपल्याला सोपे वाटतात ते अगोदर सोडवावे, मात्र ते सोडवीत असताना उजवीकडील गुणांकडे लक्ष द्यावा. प्रत्येक प्रश्न स्वतंत्र पानावर सोडवावा. उपप्रश्नांची उत्तरे एकाखाली एक लिहावीत. दोन प्रश्नांच्या उत्तरांमध्ये एक ओळ सोडावी. नंतर उत्तरे क्रमशः लिहिण्यात यावीत. जर एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर त्यात वेळ घालवू नये. जो प्रश्न कठीण वाटेल तो प्रश्न शेवटी सोडविण्यात यावा. किंवा अशा प्रश्नाला पर्यायी प्रश्न आहेत का हे पाहावे. नंतर आपल्या मनाने उत्तर लिहिण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी आधी प्रश्न समजून घ्यावा लागेल. पेपर लिहिताना मुख्य प्रश्न व उपप्रश्न यांच्या क्रमानुसार क्रमांक असतील ते लिहावेत. उत्तर एक क्रमांक वेगळा असेल तर पूर्ण गुण दिले जात नाहीत. तेव्हा क्रमांक लिहून क्रमांकाचे उत्तर लिहावे. त्यामध्ये किती शब्दांत विचारले असेल किंवा किती ओळीमध्ये विचारले असेल तर त्या पद्धतीने उत्तर सुटसुटीत व मुद्देसूद लिहावीत. उत्तर लिहिताना घाई करू नये. प्रत्येक प्रश्नाला वेळ ठरवावा त्यानुसार त्या प्रश्नाला वेळ द्यावा. म्हणजे पूर्ण पेपर सोडवून होईल. त्यासाठी परीक्षा होईपर्यंत अधूनमधून अभ्यासाबरोबर घड्याळ लावून प्रश्नपत्रिका सोडवावी. त्यामुळे अंदाज येऊन वार्षिक परीक्षेला अधिक जोमाने प्रश्नपत्रिका सोडवू शकतो. त्यासाठी अक्षर वळणदार व मोठे तसेच दोन शब्दामध्ये योग्य अंतर असावे. जास्त खाडाखोड, शाईचे डाग, अक्षरे डबल गिरवणे अक्षरावर आडवी रेघ मारणे अशा गोष्टी टाळाव्यात. असे असल्यास शिक्षकही उत्साहाने पेपर तपासण्यास टाळाटाळ करतात. याचा परिणाम विद्यार्थ्याला कमी गुण मिळू शकतात. तेव्हा अशा चुका विद्यार्थ्यांनी करू नयेत. अक्षर कसे आहे यापेक्षा अचूक उत्तर लिहिले आहे का हे महत्त्वाचे आहे. तेव्हा केवळ सुंदर अक्षराकडे जाऊ नका प्रश्नाला अनुसरून उत्तर अपेक्षित असते. अशा गोष्टी टाळून विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेचा पेपर सोडवावा.

# नव्या जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन नव्याने पदाधिकारी निवड करण्यात येणार-खा.बजरंग सोनवणे

## राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा कार्यकारणी बरखास्त-राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा पुरोगामी विचाराचा जिल्हा आहे नेहमीच शरदचंद्रजी पवार साहेबांना साथ देण्याचे काम केले- आ.सदीप क्षीरसागर बीड प्रतिनिधी - काल राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली.या बैठकीत खासदार बजरंग बप्पा सोनवणे,आमदार संदीप भैया शिरसागर व जिल्ह्यातील आजी माझी आमदार,ज्येष्ठ नेते,पदाधिकारी,मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले होते.

यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.यावेळी आमदार संदीप क्षीरसागर यांनी पक्ष फुटीच्या नंतर देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांना साथ देण्याचे काम केले व आमदार असताना पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदाची धुरा सांभाळली,त्यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की मी आमदार झाल्यानंतर जेवढे माझे सत्कार झाले नाहीत तेवढे जिल्हाध्यक्ष झाल्यानंतर माझे सत्कार झाले आहेत.बीड जिल्हा पुरोगामी विचाराचा जिल्हा आहे नेहमीच शरदचंद्रजी पवार साहेबांना साथ देण्याचे काम केले आहे,असे उद्गार संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केले, यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी मला पक्षाने जिल्हाध्यक्ष जबाबदारी दिली आहे, मी ती सार्थपणे निभावणार आहे नव्या जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन नव्याने जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यात येणार आहे व जुनी कार्यकारणी बरखास्त झाल्याची घोषणा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे,ज्या कार्यकर्त्यांनी निष्ठेने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे काम करत आहे अशा कार्यकर्त्यांना पदाधिकारी म्हणून संधी देण्याचे व्यक्त केली, यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आपल्या समारोपीय भाषणात असे म्हणाले की माझ्यासारख्या सामान्य



कार्यकर्त्याला बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून संधी देण्याचे काम पक्षाने केले आहे,काम करणाऱ्या कार्यकर्त्याला संधी मिळत असते येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांना पक्ष संधी देणार आहे,त्या संधीचं सोनं करण्याचे काम कार्यकर्ते नक्कीच करतील जिल्हाध्यक्ष यांनी नवीन जिल्हा कार्यकारणी तालुकाध्यक्ष निवड व विविध पक्षाच्या सेलचे अध्यक्ष निवडावेत असे आव्हान खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी कार्यकर्ता बैठकीत व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रवादी युवक चे प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख,राष्ट्रवादी उपाध्यक्ष अँड नर्सिंग जाधव,माजी आमदार उषाताई दराडे,सय्यद सलीम भाई,पृथ्वीराज साठे,संगीताताई ठोंबरे,ज्येष्ठ नेते डि.बी.बागल,मोहनराव जगताप, राजेसाहेब देशमुख, वैजनाथराव तांदळे, बाळासाहेब नागरे, बाळासाहेब गोरे,पवन तांदळे, संजीवनी देशमुख, विद्याताई जाधव, के के वडमारे,हेमाताई पिंपळे, कुंदन काळे, श्रीराम मुंडे, महादेव जमाले, समदभाई, शेख मोमीन, दीपक हजारे, झुंजार धांडे, मधुकर काशीद, अनिल जवकर, बाळासाहेब राऊत, राम खाडे, परमेश्वर शेळके, शंकर जाधव, जीवन देशमुख, दीपक खोले, नारायण डक, युवराज लगड, सूर्यकांत गोरे, सोमनाथराव माने, पंकज धांडे, बद्रीनाथ जटाळ, लाला पऱ्हाळे, अनिल शेळके, शफिक पेंटर,शेख जमीलभाई,शफिक काजी, शाम कोठुळे सह अधिक कार्यकर्ते उपस्थित होते,

# रोटरी क्लब ऑफ बीड द्वारा जन शिक्षण संस्थानला होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड

**बीड (प्रतिनिधी):** कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा संचलित जन शिक्षण संस्थान बीड च्या वतीने बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात १५ ते ४५ वयोगटातील निरक्षर, नवसाक्षर व प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण घेतलेल्या महिला व पुरुष यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन स्वावलंबी करण्यासाठी २००४ पासून कार्य करत आहे. कटिंग अँड टेलरिंग, ब्युटी कल्चर अँड हेल्थ केअर, ड्रेस डिझाईनिंग, हेल्पर वायरमन, हेल्पर इलेक्ट्रिकल टेक्निशियन,ज्युट बॅक मेकिंग, फॅशन ज्वेलरी, असिस्टंट कॉम्प्युटर ऑपरेटर यासारखे विविध प्रशिक्षण जन शिक्षण संस्थानच्या माध्यमातून देण्यात येत आहेत. तसेच दिव्यांग, कैदी बांधव व तृतीय पंथीयांना व्यवसायिक प्रशिक्षण दिले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ४३ हजार महिला व पुरुषांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यातील ४० टक्के लोक आज स्वतःचा व्यवसाय करत आहेत. प्रशिक्षित लाभार्थींना काम देण्यासाठी भारतरत्न नानाजी देशमुख उपजीविका केंद्राची स्थापना करण्यात



आली आहे. त्यामध्ये ज्युट बॅग, फ्रिज कव्हर, बेबी किट, गोधडी इत्यादी वस्तूंची निर्मिती केली जाते.जन शिक्षण संस्थानच्या या कार्याची दखल रोटरी क्लब ऑफ बीड यांनी घेऊन दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी रोटरी व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड मा. श्री शैलेश सूर्यवंशी उपजिल्हाधिकारी बीड व रोटेरियन हरीश मोटवानी, रोटरी क्लब ऑफ बीड चे अध्यक्ष मा. इंजी श्री नितीनजी गोपन , सचिव डॉ. श्री निलेश जी जगदाळे यांच्या हस्ते मा.संचालक गंगाधर जी देशमुख यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ बीड चे पदाधिकारी, जन शिक्षण संस्थांचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

आपल्या मनोगतात मा. संचालक श्री देशमुख सर यांनी रोटरी चे जन शिक्षण संस्थानला सहकार्य आहेच. मागील चार वर्षांपूर्वी सुद्धा रोटरी क्लब बीडने जन शिक्षण संस्थान ला शिलाई मशीन देऊन सहकार्य केलेले आहे. सामाजिक कार्यात मोठं नाव असलेल्या रोटरी क्लबने जन शिक्षण संस्थानच्या कार्याची दखल घेऊन गौरव केल्याबद्दल श्री गंगाधर जी देशमुख यांनी रोटरी क्लब ऑफ बीडचे धन्यवाद ही व्यक्त केले.

# स्वत:वर विश्वास ठेवून कार्य केल्यास यश निश्चित मिळते-डी.जी.तांदळे

**बीड( प्रतिनिधी):** स्वतःच्या कार्यावर विश्वास आणि आई - वडील - गुरूंचा आशीर्वाद मिळाल्यास यश निश्चितच मिळते, असा विश्वास माजी प्राचार्य डी.जी.तांदळे यांनी दिला.ते बुधवारी सकाळी श्री शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या शुभेच्छा समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी प्राचार्य जे. एम. पैठणे , मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, उपमुख्यद्यापक राजकुमार कदम, उपप्राचार्य बि.डी. मातकर, माजी प्रा. बिराजदार, युवक क्रांती दलाचे प्रा. पंडित तुपे, पर्यवेक्षक रमेश सुपेकर, पर्यवेक्षक गिरीश चाळक यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुढे बोलताना डी.जी.तांदळे यांनी जे शिक्षण बुद्धीला सत्याकडे;भावनेला माणुसकीकडे आणि शरीराला श्रमाकडे घेऊन जाते तेच खरे शिक्षण असते असा पंडित नेहरू यांचा विचार सांगून विद्यार्थ्यांनी चांगले बनणे हेच खूप महत्त्वाचे आहे. त्यासाठी कठोर मेहनतीशिवाय पर्याय नाही असे मत व्यक्त केले. याच कार्यक्रमात माजी प्राचार्य पैठणे सर यांनी मी श्री शिवाजी विद्यालयाचा माजी विद्यार्थी असून या शाळेचे माझ्यावर खूप उपकार आहेत. या शाळेने आपली गुणवत्ता नुसती टिकवलीच नाही तर ती वाढवली आहे. शालेय जीवनात मिळणारी ज्ञानाची शिदोरी ही आयुष्यभर पुरणारी असते. या ज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता वृद्धिंगत कराव्यात असे आवाहन माजी प्राचार्य जे. एम. पैठणे यांनी केले. अध्यक्ष समारोपात मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी घ्यावयाची खबरदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. उपमुख्याध्यापक राजकुमार कदम, उप प्राचार्य बि.डी. मातकर, प्रा.बिराजदार, प्रा. पंडित तुपे यांनी समयोचित भाषण केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कै.बळवंतराव कदम, कै.बलभीमराव कदम यांच्या प्रतिमेचे पाहुण्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील दहावीच्या प्राजक्ता नाईकवाडे, पृथ्वीराज पवार, ज्ञानेश्वर घुमरे, रितेश जगवाल, श्रेया वाळके, मधुरा परदेशी, आरती कुटे, वेदिका शिंदे, विशाल नलावडे, गौरव नागरे, पंकजा घोंगडे या विद्यार्थ्यांनी आपले शाळेविषयीचे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे बहारदार संचलन शाळेतील इंग्रजीचे अध्यापक डॉ. महेश वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमात दहावीच्या सराव परीक्षेत ९०% पेक्षा अधिक गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता खाऊ वाटपाणे झाली. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एपीएल शिधापत्रिका धारकांच्या बँक खात्यात २ कोटी ७८ लाख रुपये जमा

## आ.विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे २२,१८० लाभार्थ्यांना मिळाला लाभ

**गेवराई (प्रतिनिधी):** दारिद्र्य रेषेपेक्षा जास्तिचे उत्पन्न असलेल्या शिधापत्रिका धारक शेतकर्यांना धान्या ऐवजी प्रति लाभार्थी प्रतिमाह १५० रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर पैसे जमा होण्यास विलंब होत होता. आमदार विजयसिंह पंडित यांनी या प्रकरणी गेवराई तहसिल कार्यालयात बैठक घेत पाठपुरावा करुन पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळवुन दिला आहे. आ. पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे २ कोटी ७८ लाख ७५ हजार ४०० रुपये डीबीटी प्रणालीव्दारे महिला कुटूंब प्रमुखाच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. गेवराई तालुक्यातील २२,१८० लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हा निधी जमा झाल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे गेवराई तालुक्यातील महिला कुटूंब प्रमुखाच्या बँक खात्यावर थेट डिबीटी व्दारे २ कोटी ७८ लाख ७५ हजार ४०० रुपये जमा झालेले आहेत. माहे एप्रील २०२३ ते माहे मार्च २०२४ या कालावधीतील प्रति लाभार्थी प्रति माह १५० रुपये प्रमाणे ही रक्कम थेट डिबीटी प्रणालीव्दारे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाली आहे.आमदार विजयसिंह पंडित यांनी या प्रकरणी पुढाकार घेवुन मागील अनेक महिण्यांपासुन प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावल्यामुळे लाभार्थी शेतकर्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत. आ. विजयसिंह पंडित यांनी अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेसाठी इष्टांक वाढवुन देण्याची मागणी सुद्धा शासनाकडे केली आहे. या दोन्ही योजनांचा लाभ मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज गेवराई तहसिल कार्यालयात प्रलंबित आहेत.दारिद्र्य रेषेपेक्षा जास्तिचे उत्पन्न असलेल्या शिधापत्रिका धारक शेतकर्यांना धान्याऐवजी प्रति लाभार्थी प्रति माह १५० रुपये देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतलेला आहे. गेवराई तालुक्यात त्याची अंमलबजावणी होण्यास होत असलेल्या विलंब प्रकरणी आ. विजयसिंह पंडित यांनी तहसिल कार्यालयात संबंधित अधिकार्यांची बैठक घेतली. या बैठकीतुन त्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पुरवठा अधिकारी यांना थेट संपर्क करुन आठवडाभरात लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर पैसे जमा करण्याची मागणी केली होती. एपीएल शेतकरी योजनेचे गेवराई तालुक्यात १६,२१५ शिधापत्रिका धारक आहेत. प्रशासनाने वारंवार आवाहन केल्यानंतर यापैकी ५,१७० शिधापत्रिका धारकांनी सातबारा उतारा व इतर कागदपत्रे जमा केल्यामुळे हे लाभार्थी योजनेच्या लाभासाठी पात्र झाले आहेत. इतर लाभार्थी शेतकर्यांनी केवायसी करुन सातबारा उतारा तहसिल कार्यालयात जमा करण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या योजनेत माहे एप्रील २०२५ पासुन १५० रुपये ऐवजी १७० रुपये प्रतिमाह देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती या निमित्ताने आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. आ. पंडित यांनी लाभधारक शेतकर्यांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळवुन दिल्यामुळे तालुक्यात सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# गुरुदत्त विद्यालय चौसाळा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा

**चौसाळा । प्रतिनिधी**

गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चौसाळा चौकीचे जमादार आदरणीय खटाने साहेब व प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस अधिकारी श्री मुरुमकर साहेब. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष सयाजी (बाप्पा) शिंदे, शालेय समितीचे सदस्य संभाजी आबा जोगदंड,उमेश आंधळे, सामाजिक कार्यकर्ते शीकुर भाई सौदागर यांच्यासह विद्यार्थी पालक व शिक्षक वृंदाच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सुमित जाधव याने शाळेतील गोड आठवणी व शिक्षकांचे मार्गदर्शन याबाबत मनोगत व्यक्त केले. इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कुमारी जोगदंड सानिका हिने.



विद्यालयाच्या कुटुंबातून जाताना वाटणारी हुरहुर व्यक्त करत भविष्यात शाळेचा नावलौकिक होईल असे कर्तृत्व करून दाखवू अशी ग्वाही दिली. कु. तनुजा आंधळे कु. पूजा जाधव चि. श्रेयस जाधव यांनी शाळेतून सुसंस्काराची शिदोरी घेऊन जात असताना समाजात शाळेचा मान आणि सन्मान रखून स्वाभिमानी जगू असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री खाटणे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना समाजात आजची तरुण पिढी भरकटत चालली आहे यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून समाजात सर्व धर्म समभाव व जातीय सलोखा राखण्याचे आवाहन केले. शाळेतील शिक्षक श्री.लीमकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेचे युगात टिकायचे असेल तर जिद्द आणि चिकाटी हवी अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थी प्रिय शिक्षक श्री गुरव सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वतःच्या करिअरचा विचार करत असतानाच समाजाचे व आपल्या आई-वडिलांचे ही ऋण आपल्यावर आहे याची जाण ठेवण्याबाबत सल्ला विद्यार्थ्यांना दिला. शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्रीमंत चौधरी सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनाच्या प्रवासातील आपले ध्येय निश्चित करा व व ध्येयाकडे वाटचाल करताना सल्ला देणारा मार्गदर्शन करणारा माणूस ओळखायला शिका कारण अर्जुनापेक्षा सामर्थ्यशाली असणाऱ्या दुर्योधनाचा सल्लागार शकुनी मामा होता. त्यामुळे दुर्योधनाचा सर्व नाश झाला आणि अर्जुनाने कृष्णाच्या मार्गदर्शनाखाली कर्तृत्व सिद्ध केले. असे हृदयस्पर्शी विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी कुमारी अक्षरा भरणे व जोगदंड यांनी केले .शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववीच्या वर्गाच्या वतीने मीष्ठांनं भोजनाचे नियोजन केले. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेत दुपारची खिचडी बनवणाऱ्या श्रीमती पवार बाई यांना विद्यार्थ्यांनी भारतरत्न विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन कार्याचागुणगौरव केला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक श्री घोडके सर, श्री मोठे सर, श्रीमती साबणे मॅडम ,श्री राठोड सर ,श्री वैद्य सर शाळेतील सहकारी श्री बाळासाहेब जाधव, श्रीमती टाचतोडेबाई, श्री सोनवणे नाना, श्री धनंजय वाघमारे ,श्री विश्वनाथ पवार यांनी सहकार्य केले.

# विद्यार्थ्यांनो संशोधक होण्यासाठी आपल्या ज्ञानाचा व्यासंग वाढवा-सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई विद्यार्थ्यांनी संशोधक होण्यासाठी आपल्या ज्ञानाचा व्यासंग वाढवला पाहिजे, त्या विषयातील खोली वाढवली पाहिजे आणि आपल्या बौद्धिक क्षमतेच्या कक्षा रूंदावल्या पाहिजेत तरच खऱ्या अर्थाने संशोधक म्हणून विद्यार्थी नांवारूपाला येतील असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार उपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

योगेश्वरी महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग यांच्या द्वारे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील 'सूक्ष्म जीवांचा सभोवतालच्या परिस्थितीमध्ये समतोल राखण्यासाठी असलेली भूमिका' या अभ्यास परिषदेमध्ये ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष सी.एल.बर्दापूरकर, प्राचार्य एम.व्ही.कानेटकर, प्रा.अविनाश सोनवणे, उपप्राचार्य आर.व्ही.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी विद्यार्थी हा उपजतच संशोधक असतो शिक्षकांनी त्याच्या ज्ञानात भर घालून त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या पाहिजेत. त्याला विषयाचे ज्ञान संपूर्णपणे दिले पाहिजे जेणेकरून त्या विषयाचा अभ्यास आणि त्या विषयातील बारकावे त्या




विद्यार्थ्याला लक्षात आले पाहिजेत आणि त्या विषयाची गोडी निर्माण झाली तर आपोआप विद्यार्थी विविध प्रकारचे संशोधन त्या विषयांमध्ये करू शकतात असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. आपण आत्मसात केलेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करून समाजाच्या दृष्टीने विधायक काम करीत राहणे हा बुद्धिमत्तेचा सरळ अर्थ आहे असे म्हणत विद्यार्थ्यांनी आपली बुद्धिमत्ता स्वतःच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासाकरिता वापरावी असे आवाहनही डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी बोलताना अध्यक्ष सी.एल.बर्दापूरकर यांनी योगेश्वरी महाविद्यालयाने अनेक गुणवंत विद्यार्थी घडवले आहेत. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर योगेश्वरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपला नांवलौकिक केलेला आहे. विद्यार्थ्यांनी सजग राहून आपल्याला त्या विषयांमधले काय येते आणि काय नाही याचा अभ्यास करून आपल्या शिक्षकांमार्फत त्या विषयामधले उत्तम ज्ञान घेण्याचा प्रयत्न करावा. आपल्या ज्ञानाचा समाजाच्या उन्नतीसाठी, राष्ट्र उभारणीसाठी प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी या परिषदेत सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच या परिषदेत आपले पेपर प्रकाशित करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या परिषदेत घेण्यात आलेल्या पोस्टर आणि संशोधन मॉडेल स्पर्धेत विजेत्या प्राप्त विद्यार्थ्यांनाही मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर, उपप्राचार्य डॉ.आर.व्ही.कुलकर्णी, डॉ.वाय.एस.हंडीबाग यांनी ही राष्ट्रीय पातळीवरील परिषद यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ए.एस.कदम तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांनी केले.

# विद्यार्थी उज्वल भारताचे भविष्य-प्रा.डॉ.आगळे



**केज । प्रतिनिधी**

भारतीय संविधान दिन हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. भारतीय संविधानाची प्रत्येक विद्यार्थ्यासह नागरिकाला माहिती असणे आवश्यक आहे. कारण उद्याच्या उज्वल भारताचे भविष्य विद्यार्थी असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. सुधीर आगळे यांनी केले. ते बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित संविधानावरील चर्चासत्रात अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते.

या चर्चासत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. काशीद एन.जी हे होते. यावेळी डॉ. राऊत एस.आर., डॉ. शिंदे एस.के., डॉ. सुवर्णकार एम.बी., डॉ. काळम पी.जी. यांची उपस्थिती होती. या चर्चासत्रामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कांबळे एम.एस. यांनी तर आभार वाणिज्य विभागाचे डॉ. सरसरे एस.एम. यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गरजूंना मदत हीच खरी लोकसेवा-सोमीनाथ कोल्हे

**पाटोदा (प्रतिनिधी):** राजकारण व समाजकारण करत असताना आपल्या मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणे व गरजूंना आधार बनण्याचे सूचना व संदेश दिला आहे त्याचं अनुषंगाने यंदा त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवले आहेत गरजू व गरजवंतांना मदत करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे प्रतिपादन पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी केले तर आधार कार्ड दुरुस्तीचा उपक्रम अतिशय स्तुत्य असून गरजूंना याचा मोठा फायदा झाला असे तहसीलदार दत्तात्रय निलावडे यांनी सांगितले.



आमदार सुरेश धस यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या अनुषंगाने पाटोदा येथील सोमीनाथ कोल्हे सय्यद शहाबाज रामेश्वर गोरे व अंगद सांगळे यांच्या पुढाकारातून आधार कार्ड दुरुस्ती व राशन कार्ड दुरुस्तीचे शिबिर घेण्यात आले या शिबिरात अनेक सर्वसामान्य गरजूंनी आपल्या कागदपत्रांची दुरुस्ती करून घेतली त्याचप्रमाणे अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून मंगळवार दिनांक अकरा रोजी सफाई कामगार महिलांना साड्या वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला याप्रसंगी तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या हस्ते बाहेर बाहेर बाहेर महिलांना बाहेर महिलांना अजून बाहेर महिलांना अजून कोणता बाहेर महिलांना अजून बाहेर महिलांना अजून कोणता तहसीलदार दत्तात्रय निलावाड सहाय्यक उपनिबंधक प्रवीण पाटील ज्येष्ठ पत्रकार पोपट कोल्हे सहशिक्षक संदीप जावळे पत्रकार शेख महेश्वर यांच्या हस्ते पंचवीस गरजू महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले हा कार्यक्रम अतिशय समाज उपयोगी वस्तू त्या असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला नागरिक पदाधिकारी कर्मचारी सहभागी झाले होते.

# अबॅकस मधील सर्वोत्कृष्ट यशस्वी विद्यार्थिनी दिव्यांनी मारुती जोगदंडची लंडन अबॅकस ऑलिम्पियाडसाठी निवड

## दिव्या जोगदंडला सर्वोत्कृष्ट जागतिक अबॅकस स्पर्धक मानद साईटेशन

**बीड । प्रतिनिधी**

यशस्वी अबॅकस विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिप मध्ये दिव्यांनी मारुती जोगदंड विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक यश संपादन केलेले आहे. दिव्यांनी जोगदंडने पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवल्यामुळे समाजातील सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन होत असून फर्स्ट रनरअप म्हणून विद्यार्थ्यांचा शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या लंडन अबॅकस चॅम्पियनशिपसाठी दिव्यांनी मारुती जोगदंडची निवड करण्यात आलेली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १९४३ एकूण विद्यार्थ्यांपैकी दिव्यांनी जोगदंड ची फर्स्ट यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके सर प्रमुख अतिथी म्हणून उत्कृष्ट गणितीय शिक्षक श्री संतोष शेकडे यांनी सत्कार करून यशस्वी विद्यार्थ्यांनी गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे




असे प्रतिपादन केले तसेच अबॅकस तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि बुद्धिमत्तेचा सर्वोत्कृष्ट विकास होतो असे विशेष मार्गदर्शन डॉ. घोडके एस ए. यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील अडचणींना सामोरे जाण्यासाठी अबॅकसचा उपयोग होऊन अबॅकस स्मार्ट वर्क प्रयत्नांची स्तुती केली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून त्यांनाही यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. दिव्यांनी जोगदंडची ऑनलाइन लंडन अबॅकस २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप करीता या विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे.

# जि.प.प्रा.शाळा डोकेवाडी येथे वार्षिक स्नेहसंमेलन

**घाटसावळी (प्रतिनिधी):** जिल्हा प्राथमिकशाळा डोके वाडा ता . बीड येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले .कार्यक्रमाचे उदघाटन पो.उपनिरिक्षक बाबु डोके साहेब,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान पवार , पिंपळवाडी केंद्राचे मुअ शिवराम गाडे,प्राथमिक शिक्षक संघाच्या महिला आघाडी सरचिटणीस सुनंदा उगलमुगले, सरपंच राहुल कदम, शाळा व्यवस्थापान समितीचे अध्यक्ष सुग्रीव डोके, शाळेचे मुअ सूनिल शिंदे , भूषण टेके सर , जगन्नाथ जाधव सर , उषा दामुरडे , राणी शिंदे ,यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी शाळेतील मुलांनी विविध लोकप्रिय गीत , छोटी*नाटीका ,नकला, नृत्याविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.गावकऱ्यांच्या अलोट गर्दीत पार पडलेल्या या कार्यक्रमाचे,मनोवेधक , अप्रतिम,बहारदार सुत्रसंचलन आदर्श , तंत्रस्नेही शिक्षिका सुनंदा उगलमुगले यांनी केले . यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सुनिल शिंदे व कार्यक्रमाचे अप्रतिम बहारदार सुत्रसंचलन केल्या बद्दल तसेच मैत्रा फाउंडेशन चा शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्ती बद्दल सुनंदा उगलमुगले यांचा विशेष सत्कार करण्यात आला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मु अ सुनिल शिंदे स शि बाळासाहेब कुटे ,कांबळे सर यांनी विशेष परिश्रम घेतले

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची सभा:नाशिककरांचे आभार मानत साधला महाविकास आघाडीवर निशाणा

**नाशिक (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिक दौऱ्यावर असून येथील गोल्फ क्लब मैदानात त्यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी नाशिककरांचे आभार मानले आहेत. विधानसभा निवडणुकीत झालेल्या विजयात नाशिककरांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, येथे बारा ज्योतिर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वर आहे साडेतीन पिठा पैकी सप्तशृंगी माता आहे आणि काळाराम मंदिरात राम आणि सीताफळ आहे आणि म्हणून अशा या पवित्र भूमीमध्ये तुम्ही राहत आहे तुम्ही भाग्यवान आहात आणि मी देखील आज येथे आलो आहे मी देखील भाग्यवान आहे. शिवसेनेला आणि महायुतीला या नाशिककरांनी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये एक अद्भुत यश मिळवून दिले.एकनाथ शिंदे म्हणाले, मला वाटते १५ पैकी १४ आमदार महायुतीचे निवडून आले हा इतिहास हा रेकॉर्ड झाला या इतिहासामध्ये नाशिक सरांचे योगदान आहे. तेव्हा मी म्हणालो होतो मी निवडून आल्यानंतर निवडणूक झाल्यानंतर विजयाचा गुलाल उधळायला येईल. दिलेला शब्द पाडणारा एकनाथ शिंदे आहे फक्त गुलाल नाही तर या संपूर्ण मतदार राजाचे आभार मानायला मी या ठिकाणी आलो आहे. तुम्हाला धन्यवाद द्यायला या ठिकाणी आलो आहे.नाशिक हे भक्तांचे ठिकाण मानले जाते आणि मी देखील नाशिककरांचा भक्त झालो आहे. नाशिक पासून खाली शहादा अक्कलकुवा पर्यंत शिवसेनेचा भगवा फडकला आहे. ही कमाल लाडक्या बहिणींची आहे. लाडक्या भावांची आहे, लाडक्या शेतकऱ्यांची आहे, या लाडक्या ज्येष्ठांचे आहे. शिवसेनेवर तुम्ही विश्वास टाकला हे मी स्वतःचे भाग्य समजतो आणि म्हणून नाशिककरांचा आभार मी कसे मानू, कुठल्या शब्दात मानवे हे मला सुचत नाही.बाळासाहेब ठाकरे आणि दिघे साहेबांच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनगटात दुनिया बदलण्याची ताकद आहे. जगातल्या ३२ देशांनी नोंद घेतली हा एकनाथ शिंदे कोण आहे. हा साधा कार्यकर्ता आहे एक शिवसैनिक आहे बाळासाहेबांचा कडवट शिवसैनिक आणि आनंद दिघे साहेबांचा शिवसैनिक आहे. तू कधी कोणाला घाबरला नाही आणि घाबरणार की नाही. जेव्हा शिवसेनेचे खच्चीकरण होऊ लागले ते आम्हाला बघवले नाही. शिवसेना आणि धनुष्यबाण काँग्रेसच्या दारात गहाण टाकली. लोक सत्तेकडे जातात आम्ही सत्तेचा विरोधात जात होतो काय होणार काय माहित नव्हतं. पण ज्याच्या मागे परमेश्वराचे कृपा आणि बाळासाहेबांच्या आशीर्वाद आनंद दिघे साहेबांचे आशीर्वाद आणि तमाम शिवसैनिकांचे आशीर्वाद आहेत हा एकनाथ शिंदे लढला आणि जिंकला. अडीच वर्षे पायाला भिंगरी लावून हा एकनाथ शिंदे लढला, न झोपता देखील या तुमच्या एकनाथ शिंदेने काम केले. या महाराष्ट्रात अडीच वर्ष ज्यांनी सगळे बंद करून ठेवले होते अडीच वर्षांपूर्वी जलयुक्त शिवार मराठवाडा वॉटर ग्रीड. हे सगळं बंद करून ठेवले. महाविकास आघाडीने सगळे काही बंद करून ठेवले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077